राजकीय व सामाजिक आंदोलनातील प्रलंबित खटले मागे घेण्याच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२(ई-८१७५१६)/विशा-२

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई -४०० ०३२.

दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२६.

वाचा : १.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ- ०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक २०/०९/२०२२.
२.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ- ०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक १०/११/२०२२.
३.गृह विभाग,शासन शुद्धिपत्रक क्र.पीआरओ- ०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक २७/१२/२०२२.
४.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक १४/०९/२०२३.
५.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक १२/०२/२०२४.
६.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक ३१/०७/२०२४.
७. गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०५१६/प्र.क्र.१०६/विशा-२, दिनांक २७/०३/२०२५.
८.गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक २०/०६/२०२५.
९. गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक १२/०९/२०२५.
१०. गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२(ई-८१७५१६)/विशा-२, दिनांक १७/११/२०२५.
११. गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२(ई-८१७५१६)/विशा-२, दिनांक २१/०७/२०२६.
१२. गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२(ई-८१७५१६)/विशा-२, दिनांक १२/०८/२०२६.
१३. शासन निर्णय, दि.२७/०३/२०२५ अन्वये गठित मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे दि.२२/०९/२०२६ रोजीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांच्याकडून सार्वजनिक हिताच्या व वेगवेगळ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घेराव घालणे, मोर्चे काढणे, निदर्शने करणे इ. स्वरुपाचे आंदोलनाचे मार्ग अनुसरले जातात. त्यानुषंगाने राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये दाखल झालेले खटले मागे घेण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अटी/शर्ती, मार्गदर्शक तत्त्वे व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.१२ येथील दि.१२/०८/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.३१/०३/२०२७ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील असे खटले मागे घेण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील अट क्र.२ नुसार, खटले मागे घेण्यासाठी *"अशा घटनेत खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रु.५,००,०००/- पेक्षा जास्त नुकसान झालेले नसावे"* अशी अट निश्चित करण्यात आली आहे. उक्त रु.५,००,०००/- ही मर्यादा गेल्या अनेक वर्षापासून कायम असून, त्यात बदल अथवा सुधारणा करण्यात आलेली नाही. सद्यस्थितीत बांधकाम साहित्य, देखभाल खर्च व महागाई निर्देशांकातील वाढ विचारात घेता, पूर्वीच्या तुलनेत साध्या व किरकोळ नुकसानीचे आर्थिक मूल्यांकन रु.५,००,०००/- च्या मर्यादेपुढे जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

न्यायालयांवरील प्रलंबित खटल्यांचा भार कमी करणे, आंदोलनामध्ये सहभागी असणारे विद्यार्थी, तरुण आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे भवितव्य सुरक्षित करणे आणि पोलीस प्रशासकीय यंत्रणेचा वेळ अधिक गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी वापरणे या दृष्टीने, संदर्भाधीन क्र.७ येथील दि.२७/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित मा. मंत्रिमंडळ उपसमितीने दि.१७.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत सदर नुकसान मुल्यांकन मर्यादा रु.५,००,०००/- वरुन वाढवून रु.७,५०,०००/- करण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त नमूद कारणमिमांसा व मा. मंत्रिमंडळ उपसमितीची शिफारस पाहता, दि.२०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील संबंधित अटीमध्ये अंशत: सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राजकीय व सामाजिक आंदोलनातील प्रलंबित खटले मागे घेण्याबाबतच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील अट क्र.२ मध्ये "अशा घटनेत खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रु.५,००,०००/- पेक्षा जास्त नुकसान झालेले नसावे" ऐवजी **"अशा घटनेत खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रु.७,५०,०००/- (रुपये सात लक्ष पन्नास हजार फक्त) पेक्षा जास्त नुकसान झालेले नसावे",** अशी अंशत: सुधारणा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीआरओ-०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक २० सप्टेंबर, २०२२ मधील इतर अटी, शर्ती व तरतुदी कायम राहतील.

उक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६११२५१३२०५७११२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA MOTIRAM HOLKAR

Digitally signed by RAJENDRA MOTIRAM HOLKAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=AC1BF43D6979CA6D925E9240F8C09BF2F3128AD5D62A0DD7D57D2B72C9EA41F4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=48F41D082A9DD86B54CCCF5B4C6A83A6132C3F6F06A9940BD960612800458BA7, cn=RAJENDRA MOTIRAM HOLKAR
Date: 2026.11.25 13:22:02 +05'30'

(राजेंद्र होळकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. प्रधान सचिव, (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१४. सचिव,माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६. सर्व विभागीय आयुक्त.
१७. सर्व जिल्हा दंडाधिकारी.
१८. सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह).
१९. सर्व पोलीस अधीक्षक.
२०. सर्व अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक.
२१. सर्व पोलीस सह / उप आयुक्त (गुन्हे).
२२. सर्व उप विभागीय अधिकारी.
२३. सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त.
२४. सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी.
२५. सर्व सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता.
२६. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७. अध्यक्ष,इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय)समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
२८. अध्यक्ष,नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई
२९. अध्यक्ष,भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भगवान चौक, नरिमन पॉईंट, मुंबई.
३०. अध्यक्ष,भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई.
३१. अध्यक्ष,भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी, मुंबई.
३२. अध्यक्ष,राष्ट्रीय जनता दल (से.), एल.आय.सी. इमारतीसमोर, मुंबई.
३३. अध्यक्ष,बहुजन समाज पार्टी, डी -१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई.
३४. अध्यक्ष,शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई.
३५. अध्यक्ष,महाराष्ट्र नवनिर्माण सेना,राजगड,२०२,मातोश्री टॉवर,दुसरा मजला,पद्माबाई ठक्कर मार्ग,माटुंगा (प.),मुंबई.
३६. निवडनस्ती, विशा-२.